तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या नियत अस्थायी आस्थापनेवरील ४ पदांना दि.२९/०२/२०१६ च्या पुढे दि.०१/०३/२०१६ ते दि. २८/०२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. मुदतवाढ -२०१५/(८४/२०१५)/निवसं-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३/०२/२०१६

पहावे : १) शासन निर्णय क्र.मुदतवाढ-२०१४/(२०८/१४)/निवसं-३ दि.१७/०१/२०१५.
२) मु.अ.तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.तापाविम/मुअ/आस्था-५/६२४७/सन २०१५, दि. १८/१२/२०१५ चे पत्र.

शासन निर्णय

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव या महामंडळ कार्यालयातील कार्यरत असलेल्या (१) कार्यकारी संचालक (२) मुख्य अभियंता (३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी (४) कार्यकारी अभियंता , या नियत अस्थायी आस्थापनेवरील ४ पदांना शासन निर्णय क्र. मुदतवाढ-२०१४/(२०८/२०१४)/निवसं-३ दि.१७/०१/२०१५ अन्वये दि.२९/०२/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आता या शासन निर्णय अन्वये सदर पदांना त्यापुढील दि.०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. या वरील होणारा खर्च मागणी क्र. आय-५, (नियत अस्थायी आस्थापना) ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधा-यावरील भांडवली खर्च,८०, सर्वसाधारण , १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (०४) योजनेतर - वेतनावरील खर्चासाठी भाग भांडवली अंशदान (०४) (०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०१ आय १९८) या लेखाशिर्षाखाली महामंडळाकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र.असंक-१००४/प्रक-१२/(भाग-२)/२००४ वित्तीय सुधारणा-१, दि.४/१०/२००४ नुसार विभागास दिलेल्या प्राधिकारानुसार आंतरवित्त सल्लागार व सह सचिव यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०३१४३०२२६५२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Karbhari Wavikar

Digitally signed by Subhash Karbhari Wavikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=c1dfbe234f89f9f421dedea9417a25ac37b41f3f7be6e21151fa019453cfd5a5, cn=Subhash Karbhari Wavikar
Date: 2016.02.03 14:44:22 +05'30'

सहपत्र- परिशिष्ट अ

(सु.का.वावीकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत-सहपत्रासह:-

१) वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई.

२) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
५) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
६) आंतरवित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कक्ष अधिकारी, आ(प्रशि) कार्यासन/ कक्ष अधिकारी, निवसं-१, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवसं-३ कार्यासन संग्रहार्थ.

शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र.मुदतवाढ - २०१५/(८४/२०१५)/निवसं-३, दिनांक ३.०२.२०१६

परिशिष्ट-अ

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचेकडील
नियत अस्थायी आस्थापनेवरील पदे.

अ.क्र.	पदांचे नाव	पदांची संख्या
१	२	३
१	कार्यकारी संचालक (अभियांत्रिकी सेवेच्या संवर्गातील सचिवांच्या दर्जाचे)	१
२	मुख्य अभियंता	१
३	मुख्य लेखा व वित्त अधिकारी (संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यापेक्षा कमी दर्जाचा नसलेला)	१
४	कार्यकारी अभियंता	१
	एकूण	**४**